दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २९२
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, मंगळवार, दि.०३ जून २०२५




## थोडक्यात

### किमान १० जूनपर्यंत पावसात घट... शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०२, ठाणे :** बदललेल्या वातावरणामुळे मॉन्सूनच्या प्रवासाची गती कमी होण्यास सुरुवात झाली असल्याने मान्सूनचा प्रवास पूर्णपणे रखडला आहे. किमान १० जूनपर्यंत तरी मॉन्सूनचा प्रवास थांबणार असल्याचा अंदाज आहे, ज्यामुळे यादरम्यान केवळ पश्चिम किनारपट्टी आणि राज्यातील काही भागात प्रामुख्याने हलका पाऊस पडण्याचा अंदाज आहे. राज्यातील बहुतांश भागात मात्र कोरडे हवामान अपेक्षित आहे, ज्यामुळे कमाल तापमानात वाढ होईल. विदर्भात ४० अंशापर्यंत कमाल तापमान राहण्याची शक्यता आहे तर मराठवाडा आणि खानदेशात कमाल तापमान ३५ ते ४० अंशामध्ये राहील. या कोरड्या हवामानाचा वाईट परिणाम पेरणी आणि लागवडीवर होण्याची शक्यता आहे.

कोणत्याही खोट्या बातम्यांवर विश्वास ठेवून शेतकऱ्यांनी (प्रामुख्याने कोरडवाहू) पेरणी आणि लागवडीची घाई करू नये, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

### छत्रपती संभाजीनगरात घडले सैराट




**दि.०२, छत्रपती संभाजीनगर :** लेकीने पळून जाऊन लग्न केलं म्हणून तिच्याच घरच्यांनी तिला संपवलं, तर कधी तिच्यासब तिच्या नवऱ्यालाही मारलं, अशा अनेक घटना आजवर घडल्या आहेत. सैराट सिनेमातही हाच विषय दाखवण्यात आला आहे. अशीच काहीशी घटना छत्रपती संभाजीनगरात घडली होती, ज्याने संपूर्ण राज्याला नाही तर देशाला हादरवून सोडलं होतं. पळून जाऊन प्रेमविवाह केल्याने थेट बहिणीचं मुंडकं उडवल्याचा धक्कादायक प्रकार घडला होता. आई आणि भावाने मिळून या विवाहितेची तिच्याच घरात हत्या केली होती. त्यावेळी तिचा पतीही घरात होता. या दुर्दैवी विवाहितेचं नाव किर्ती होतं. ती फक्त १९ वर्षांची होती.

छत्रपती संभाजीनगर येथील वैजापूर तालुक्यातील लाडगाव शिवारात ५ डिसेंबर २०२१ रोजी ही घटना घडली होती. गोयगाव येथील रहिवासी किर्तीने अविनाश संजय थोरे (२२) याच्याशी जून २०२१ मध्ये पळून जाऊन लग्न केलं होतं. त्यांनी प्रेमविवाह केला होता. या लग्नाला तिच्या घरच्यांचा विरोध होता. अविनाश हा तिचा कॉलेजचा प्रियकर होता. त्याच्यासोबत ती पळून गेली होती आणि त्यानंतर आठवडा भराने या दोघांनी लग्न केलं. या घटनेने किर्तीचे वडील संजय मोटे हे खूप नाराज होते. लेक पळून गेल्यानंतर ते देखील घर सोडून निघून गेले आणि काही दिवसांनी परतले.

**लग्नाच्या पाच महिन्यांनी आईची भेट**

लग्नाच्या पाच महिन्यांनी किर्तीची आई शोभाबाई मोटे (३८) या तिला भेटायला आल्या. लग्नानंतर पहिल्यांदाच आपली आई आपल्याला भेटायला आल्याने किर्तीचा आनंद गगनात मावेनासा झाला. त्यानंतर आठवडा भराने तिची आई पुन्हा तिला भेटायला आली. मात्र, यावेळी त्या मुलीला भेटायला नाही तर तिचा खून करण्याच्या उद्देशाने आल्या होता. किर्ती ही दोन महिन्यांची गर्भवती होती, तरी तिच्या आईला तिच्यावर दया आली नाही.

५ डिसेंबर २०२१ रोजी शोभाबाई मोटे या किर्तीला भेटायला आल्या. यावेळी तिचा भाऊ संकेत मोटेही सोबत होता. किर्तीचा नवरा घरात आराम करत होता. तर सासरे हे शेतात कामाला गेले होते. किर्तीने आईला आणि भावाला घरात बोलावलं आणि ती आनंदाने त्या दोघांसाठी चहा बनवायला स्वयंपाकखोलीत गेली. तेवढ्यात संकेत तिच्या मागे गेला आणि तिच्यावर कोयत्याने सपासप वार केले. यावेळी तिच्या आईने तिचे पाय धरले होते. पहिला वार होताच किर्तीने आरडाओरड केली, तिचा आवाज ऐकून अविनाश धावून गेला, तेव्हा संकेत तिच्या गळ्यावर वार करत असल्याचं त्याला दिसलं, तर तिच्या आईने तिचे पाय पकडले होते. अविनाश किर्तीला वाचवायला धावला तेव्हा संकेतने त्याच्यावरही कोयता भिरकावला, त्यामुळे अविनाश बाहेर धावला आणि मदतीसाठी याचना करु लागला.

**बहिणीचं मुंडकं छाटलं, त्याच्यासोबत सेल्फीही घेतला**

त्याचा आवाज ऐकून त्याची काकू आणि इतर सगळे धावून आले. तेवढ्यात संकेत हा किर्तीचं मुंडकं हातात घेऊन बाहेर आला. हे पाहताच अविनाश आणि त्याच्या काकूने आक्रोश केला. तर संकेतने किर्तीच्या मुंडक्यासोबत सेल्फी काढला. बहिणीचं शीर धडापासून वेगळं होतपर्यंत तो तिच्यावर वार करत राहिला.

याप्रकरणी पोलिसांनी दोन्ही आरोपींना अटक केली होती. तब्बल तीन वर्षांनी म्हणजेच मे २०२४ ला या प्रकरणावर निकाल आला. याप्रकरणी वैजापूर अतिरिक्त जिल्हा आणि सत्र न्यायालयाने आई शोभाबाई मोटे आणि भाऊ संकेत मोटेला जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे.

## रशिया युक्रेनवर पलटवार करण्याच्या तयारीत ; भारताची चिंता वाढली

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०२, नवी दिल्ली :** रशिया-युक्रेन युद्ध अतिशय धोकादायक वळणावर येऊन पोहोचलं आहे. गेल्या तीन वर्षांपासून दोन्ही देशांमध्ये संघर्ष सुरु आहे. आता युक्रेननं रशियाच्या ५ हवाई तळांवर ड्रोन हल्ले करत तब्बल ४० हून अधिक लढाऊ विमानं बेचिराख केली आहे. रशियन अध्यक्ष व्लादीमीर पुतीन यांच्या नेतृत्त्वाची शैली पाहता युक्रेनला लवकरच तिखट प्रत्युत्तर दिलं जाऊ शकतं. त्यामुळे परिस्थिती अधिक तणावपूर्ण बनली आहे. या सगळ्या परिस्थितीत भारताची चिंता वाढली आहे.

जगातील अर्थव्यवस्थांचा विचार करता भारताची प्रगती वेगानं सुरु आहे. रशियानं युक्रेनवर प्रतिहल्ला केल्यास भारताच्या अडचणी वाढू शकतात. भारताच्या प्रगतीला ब्रेक लागण्याची शक्यता आहे. रशियानं



युक्रेनवर पलटवार केल्यास त्याचा परिणाम जागतिक ऊर्जा बाजारावर होईल. या बाजारात अस्थिरता निमर्ाण होईल. रशियाकडून भारत खनिज तेल खरेदी करतो. तेलासाठी भारत परावलंबी आहे. त्यामुळे भारताला खनिज तेलाची आयात करावी लागते. खनिज तेलाच्या बाजारात अस्थिरता निर्माण झाल्यास दरांमध्ये वाढ होईल. त्यामुळे आयातीवरील खर्च वाढेल. याचा परिणाम म्हणजे महागाई वाढेल. मार्च २०२५ पर्यंतच्या आकडेवारीनुसार, भारताच्या आयातीत रशियाचा वाटा मोठा आहे. भारत आयात करत असलेल्या तेलातील ३६ टक्के वाटा रशियाचा आहे. एप्रिल २०२५ मध्ये हे प्रमाण ३९.३ टक्क्यांपर्यंत पोहोचलं होतं. पाश्चिमात्य देशांनी रशियावर निर्बंध लादलेले असताना भारतानं सवलतीच्या दरात रशियाकडून तेल खरेदी केली. रशियावर निर्बंध असताना भारतानं तेल खरेदी वाढवली. त्यामुळे भारताला होणारा तेल पुरवठा प्रामुख्यानं रशियाकडूनच होतो.

रशियानं पलटवार केल्यास, त्यांच्यावर असलेले निर्बंध वाढवले जातील. याचा फटका भारताही बसेल. त्याचे संकेत आतापासूनच मिळू लागले आहेत. रशियाकडून तेल आणि पेट्रोलियम उत्पादनं खरेदी करणाऱ्या देशांना आर्थिक दणका देण्याच्या तयारीत अमेरिका आहे. रशियाकडून तेल आणि पेट्रोलियम पदार्थ खरेदी करणाऱ्या देशांवर ५०० टक्के टॅरिफ लावण्याचा विचार अमेरिकेचे खासदार रिचर्ड ब्लूमेंथल यांनी बोलून दाखवला आहे. रशियाला कमकुवत करण्यासाठी चीन आणि भारतासारख्या देशांवर दबाव टाकण्याचा अमेरिकेचा प्रयत्न आहे.

## नव्या कोऱ्या लालपरीमुळे यंदाची आषाढी वारी वारकऱ्यांसाठी सुखद ठरणार

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०२, मुंबई :** नुकत्याच राज्य परिवहन महामंडळाने नवीन बसेस घेतल्या आहेत. या बसेसमधून यंदाच्या आषाढी वारीचा प्रवास भाविकांना करता येणार आहे. तब्बल नऊ वर्षानंतर नवीन बसेसची खरेदी महामंडळाने केली आहे.आषाढी वारीत पांडुरंगाच्या दर्शनासाठी नव्या लालपरीतून होणार आहे.

गाव तेथे एसटी असे घोषवाक्य असलेली लालपरी गावागावात धावत असते. राज्यभरातील प्रवाशांसाठी लालपरी प्रवासाचे सर्वात महत्वाचे साधन आहे. गेली अनेक वर्ष एसटीच्या ताफ्यात नवीन बसेसचा समावेश केला गेला नव्हता. परंतु आता राज्य परिवहन महामंडळाने तीन हजार नवीन बसेसची खरेदी केली आहे. आषाढी वारीत भाविकांना या नवीन बसेसमधून प्रवास करता येणार आहे. राज्यभरातून वारीसाठी दोन हजार बस धावणार आहेत. यामुळे वारकऱ्यांचा एसटी प्रवास सुखद होणार आहे.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) ताफ्यात नऊ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर नवीन लालपरी दाखल होत आहे. त्यामुळे यंदाच्या आषाढी वारीत पुण्यासह



राज्याच्या कानाकोपऱ्यातून लाडक्या पांडुरंगाच्या भेटीला जाणाऱ्या भाविकांना नवीन लालपरीचा सुखद प्रवास अनुभवता येणार आहे.

**२०१६ नंतर बसेसची खरेदी**

काही वर्षांपूर्वी आषाढी वारी आणि दिवाळीपूर्वी एसटीच्या ताफ्यात नवीन बस दाखल होत होत्या. मात्र, २०१६ नंतर एसटी महामंडळाकडून नवीन बसची खरेदी झालीच नाही. त्यामुळे मागील नऊ वर्षांपासून जुन्या बसनेच आषाढी वारी, दिवाळी यांचा प्रवास सुरू होता. गेल्या काही वर्षांत आषाढी वारीत वारकऱ्यांना आणि दिवाळीला गावी जाणाऱ्या प्रवाशांना नवीन लालपरीचा प्रवासाचा सुखद अनुभव येत नव्हता. मागील वर्षी पुणे विभागातून आषाढी वारीसाठी पुण्यातून पंढरपूरसाठी ३८० बस सोडण्यात आल्या. या सर्व बस जुन्या होत्या. परंतु आता नवीन बसेसची खरेदी झाली आहे. त्यामुळे भाविकांचा प्रवास सुखद होणार आहे.

यंदा राज्यातील सर्व आगारांत एसटीच्या ताफ्यात नव्या लालपरी दाखल होत आहेत. पुणे विभागात ६५ लालपरी नव्याने दाखल झाल्या आहेत. पुढील महिन्याभरात तेवढ्याच बस दाखल होणार आहेत. महामंडळाच्या ताफ्यात आतापर्यंत दीड हजार बस दाखल झाल्या आहेत. तसेच पुढील एक महिन्यात आणखी एक हजार बसेस येणार आहे.

दरम्यान नवीन बसेसमध्ये अनेक सुविधा एसटी महामंडळाने तीन हजार नवीन बसेस घेतल्या आहे. या बसेस अत्याधुनिक आहेत. यामध्ये अनेक सुविधांचा समावेश केला आहे. तीन बाय दोन या पद्धतीने या बसेसची बांधणी करण्यात आली आहे. या बसमध्ये डिजिटल डॅशबोर्ड, सेन्सरयुक्त इंजिन, कॅमेरे, चार्जिंग पोर्ट्स दिले आहे. तसेच बसमध्ये काही बिघाड झाला तर ते शोधण्यासाठी संगणक प्रणाली आहे. या बसेस चेसिसवर न बांधता आधुनिक तंत्रज्ञानाने तयार केल्या आहेत.

## ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पामार्फत क्रुझर पर्यटकांकरिता चंद्रपूर ते मोहर्ली बससेवा सुरू

### आ.जोरगेवार यांच्या हस्ते बसचे उद्घाटन संपन्न



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०२, चंद्रपूर :** ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प भारतातील प्रसिद्ध व्याघ्र प्रकल्पापैकी एक असून जगभरातील व देशातील निसर्ग पर्यटक या वनाचा आणि वन्यजीवांचा आनंद उपभोगण्याकरिता या व्याघ्र प्रकल्प क्षेत्रामध्ये येतात. याच पार्श्वभूमीवर चंद्रपूर जिल्ह्यातील निसर्ग पर्यटकांना अल्प दरामध्ये या वनाचा आनंद घेण्याकरिता वर्ष २०२३ मध्ये क्रुझर सेवा सुरु करण्यात आली होती. पर्यटकांचा ओघ बघता मोहर्ली गेट मार्फत ४ व कोलारा गेट मार्फत ३ अशा एकूण ७ क्रुझर मार्फत कोर क्षेत्रात पर्यटन सेवेकरिता उपलब्ध करून देण्यात आले होते. सदर सेवेमार्फत स्थानिक जिल्ह्यातील निसर्ग पर्यटक, सामान्य नागरिक यांना ताडोबा सफारीचा आनंद मनमुराद मिळत आहे. वर्ष २०२३ ते वर्ष २०२५ पर्यत ५८००० निसर्ग पर्यटकांनी या क्रुझरद्वारे ताडोबा सफारीचा अनुभव घेतला आहे.

सदर उपक्रमाच्या माध्यमातून वने व वन्यजीवाविषयी जनजागृती सुद्धा सामान्य नागरीकामध्ये होत आहे हे विशेष. सदर उपक्रमाची यशस्विता बघता चंद्रपूर जिल्हातील पर्यटकांना चंद्रपूर ते मोहुर्ली येथे सकाळी व दुपार सफारी जाणे-येणे करण्यासाठी अडचण जात होती. ही बाब लक्ष्यात घेऊन ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या वतीने तसेच आ. किशोर जोरगेवार, विधानसभा सदस्य, चंद्रपूर यांच्या मार्गदर्शनाखाली क्रुझर पर्यटकांकरिता चंद्रपूर ते मोहर्ली ४० सीटर बस उपलब्ध करण्यात आली असून दिनांक १ जून २०२५ ला आ. किशोर जोरगेवार, विधानसभा सदस्य, चंद्रपूर यांच्या शुभहस्ते बससेवेचे उद्घाटन पार पडले. सदर बसमार्फत सकाळच्या सफारीकरिता ४.३० वाजता व सफारी पूर्ण झाल्यानंतर सकाळी १० वाजता चंद्रपूर परत येणार त्याचप्रमाणे दुपारच्या सफारी करिता २ वाजता तर परत ७.३० वाजता चंद्रपूर ला पर्यटकांन सोडणार आहे. सदर बससेवा उपसंचालक (कोर) कार्यालय, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, रामबाग वनवसाहत, मुल रोड, चंद्रपूर येथून प्रस्थान करणार आहे. या प्रंसगी डॉ. जितेंद्र रामगावकर (भावसे) मुख्य वनसंरक्षक, चंद्रपूर वनवृत्त चंद्रपूर यांची प्रमुख उपस्थिती होती तसेच डॉ. प्रभू नाथ शुक्ल (भावसे) वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा संपन्न झाला. यावेळी कुशाग्र पाठक, उपसंचालक बफर, विवेक नातू, सहायक वनसंरक्षक, कोर, अरुण गोंड, वनपरिक्षेत्र अधिकारी, मोहर्ली, संतोष थीपे, वन परिक्षेत्र अधिकारी, मोहर्ली बफर, श्रीमती. स्वाती महिसकर, वनपरिक्षेत्र अधिकारी, चंद्रपूर बफर तसेच सर्व वन कमर्चारी तसेच चंद्रपूर शहारातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय



### दोष तर पावसाचाच

पावसाने यंदा मे महिन्याच्या अखेरीसच हजेरी लावल्याने महाराष्ट्रातील सर्व शहरांमध्ये व निमशहरांमध्ये असलेल्या सुविधांची दाणादाण उडाली. अनेक ठिकाणी पाणी तुंबले, काही ठिकाणी रस्त्यांवरूनच पाणी वाहू लागले, या पूर्वी कधीही न तुंबलेल्या ठिकाणी पाणी तुंबले येथपासून ते कालव्याला भगदाड पडेपर्यंत अनेक गोष्टी घडल्या. शेतातील पिकांचे नुकसान झाले म्हणून शेतकरी हवालदिल झाले आणि शहरामध्ये राहणाऱ्यांना, आपण येथे राहायचे कसे, असा प्रश्न सतावू लागला. खरे तर दर वर्षी पावसाळ्याच्या तोंडावर ही चर्चा सुरू होते. पावसाळा नियमितपणे सुरू झाला की ती थांबते. पाऊस दर वर्षीच आणि ठरलेल्या वेळेला येतो, पण तरीही तो येण्यापूर्वीची कामे कधीही वेळेत होत नाहीत. कोट्यवधी रुपये यासाठी खर्च होतात आणि पावसाच्या पाण्यात वाहून जातात. दरवर्षी हा तमाशा होत असला तरीही त्याबद्दल कधीच कोणाला जबाबदार धरले जात नाही आणि कोणावर मोठी कारवाई झाल्याचे कधी ऐकू येत नाही. हे असे का होते? की, हे असेच व्हावे, यासाठी आपले राज्यकर्ते आणि अधिकारी संगनमताने हे होऊ देतात? या प्रश्नाचे उत्तर ठामपणे 'नाही' असे देण्यासारखी परिस्थिती नाही. किंबहुना दर वर्षी पावसाच्या पाण्यातून मलई तयार करणारी यंत्रणा महाराष्ट्रातील राज्यकर्त्यांनी व अधिकाऱ्यांनी तयार केली आहे, असेच यातून समोर येते. माध्यमांमधून त्याच्याबद्दल थोडीफार ओरड होते. पण त्यानंतर काही तरी नवीन विषय येतो आणि सगळे शांत होते.

खरे तर दर वर्षीच साधारण आठ जूनला मान्सून महाराष्ट्रात येतो. सर्व महानगरपालिकांचा अर्थसंकल्प फेब्रुवारी महिन्यातच मंजूर होतो. एक एप्रिलपासून त्याची अंमलबजावणी सुरू होते. मग या कामाच्या वेळेवर निविदा काढणे, त्याच्यावर देखरेखीची यंत्रणा उभी करणे काय अवघड आहे? मुंबईच्या मिठी नदीतून गेली अनेक वर्षे गाळ काढला जातो आहे. हजार कोटी रुपयांहून अधिक रक्कम त्यासाठी गाळात घालण्यात आली. पण यंदाही या नदीतील निम्माच गाळ पावसापूर्वी काढून झाला होता. आता या प्रकरणात तक्रार झाल्यानंतर त्याची चौकशी सुरू आहे. काहींना अटकही झाली आहे. हे प्रकरण काही तरी वेगळे राजकीय वळण घेणार, अशी चिन्हे दिसत आहेत. पण, मिठी नदीतील गाळ नक्की कधी निघणार, त्याची कोठे विल्हेवाट लावणार, नेमका गाळ किती आहे, कोणत्या तंत्रज्ञानाने तो मोजला आहे, तो काढण्यावरील खर्चाचे काही प्रमाण आहे का, त्यासाठीची अत्याधुनिक यंत्रसामग्री संबंधित कंत्राटदारांकडे आहे का या प्रश्नांची उत्तरे शोधणे आवश्यक आहे.

सर्वत्र सुरू असलेल्या रस्त्यांच्या कामांमुळे सध्या मुंबईला एखाद्या खंडहराचे स्वरूप आले आहे. बरे, काँक्रीटचे रस्ते करताना आधीचे डांबर काढण्याची तसदी अनेक ठिकाणी घेण्यात आलेली नाही. त्यामुळे काँक्रीटचे रस्ते जुन्या रस्त्यांपेक्षा उंच झाले आहेत. त्याशिवाय चौकामध्ये जुना रस्ता व नवीन रस्ता यांना जोडण्याची कोणतीही निश्चित पद्धती नसल्याने तेथे पाणी साचून तळी होऊ लागली आहेत. त्याशिवाय अर्धवट कामांच्या खड्ड्यांमध्ये साठणारे पाणी वेगळेच. या खड्ड्यामध्ये साठलेल्या पाण्याने परवा माजलगावच्या माजी आमदाराचा जीव घेतला. रस्त्याच्या खड्ड्यातील पाणी अचानक त्यांच्या मोटारीच्या काचेवर आले व चालकाला पुढचे काही दिसेनासे झाले. त्याने ब्रेक लावल्यानंतर गाडीने चारदा कोलांटी उडी मारली. त्यामध्ये या माजी आमदार महोदयांचे निधन झाले. माजी आमदाराच्या जिवाची किंमतही बहुधा सामान्य माणसाच्या जिवाएवढीच आहे, हे महाराष्ट्राला समजून चुकले आहे. त्यांच्या निधनाबद्दल अनेक आजी माजी आमदार, मंत्री व अधिकाऱ्यांनीही शोक व्यक्त केला. पण हा अपघात नक्की कशामुळे झाला, त्याला जबाबदार कोण, हे शोधून त्यांच्यावर कारवाई झाल्याची बातमी कुठेही वाचायला मिळाली नाही. पुण्यात वेळेवर झाडाच्या फांद्या कापल्या न गेल्यामुळे एका रिक्षावर त्या पडून त्यातील एका महिलेचा जीव गेला. राज्यातील सामान्यांचे जगणे इतके स्वस्त झाले आहे. सामान्य घरातील या महिलेच्या घरी जाऊन शोक व्यक्त करायला कुठल्याही मान्यवरांना वेळ होणार नाही; पण ती अपघातग्रस्त रिक्षा छत्तीस तास जागेवरच पडून होती, याला काय म्हणावे? काहीही चूक नसलेल्या त्या रिक्षाचालकाला त्याच्या नुकसानीची भरपाई कोण देणार?

पावसाने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना काही तरी भरपाई मिळेल अशी आशा आहे. पण गटाराचे पाणी घरामध्ये, दुकानांमध्ये, झोपड्यांमध्ये शिरून झालेल्या नुकसानीची कोणी दखलही घ्यायला तयार नाही. वर्तमानपत्रांचे रकाने भरले, वाहिन्यांनी दिवसभर ती दृश्ये दाखविली. पण या सगळ्यांच्या मदतीसाठी कोणतीही यंत्रणा गेल्याचे कोणालाही दिसले नाही. कारण हे करायचेच नाही, हे ठरलेले आहे. हे लोक फार तर एक दिवस ओरड करतील व दुसऱ्या दिवशी नशिबाला दोष देत कामाला लागतील, हे सगळ्यांनाच पक्के माहिती आहे.

# लोकनेते गोपीनाथ मुंडे

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**मो. ९९२२५४६२९५**



कोणताही राजकीय वारसा नसताना, स्वकर्तृत्वाने राजकारणाचे शिखर गाठणारे नेते भारतीय राजकारणात हाताच्या बोटांवर मोजण्याइतकेच असतील यात लोकनेते म्हटले जाणारे एकमेव नेते म्हणजे स्वर्गीय गोपीनाथ मुंडे साहेब. आज ३ जून, आज साहेबांची पुण्यतिथी. ३ जून २०१४ रोजी साहेब आपल्या लाखो अनुयायांना पोरके करून निघून गेले. १२ डिसेंबर १९४९ रोजी बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील नाथरा गावी एका सामान्य शेतकरी कुटुंबात जमलेल्या गोपीनाथ मुंडे यांच्या वडिलांचे नाव पांडुरंगराव आणि आईचे नाव लिंबाबाई मुंडे असे होते. १९६९ सालीच गोपीनाथ मुंडे यांचे पितृछत्र हरपले. वडीलबंधु पंडितअण्णा यांनी त्यांचे शिक्षण पूर्ण केले. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी ते आंबेजोगाई येथे आले तिथेच त्यांच्यातील नेतृत्व समाजासमोर आले. महाविद्यालयीन निवडणुकीद्वारे त्यांचे नेतृत्व उदयास आले. याच सुमारास त्यांची ओळख भाजप नेते प्रमोद महाजनांशी झाली आणि त्यांच्यात मैत्री निर्माण झाली ही मैत्री पूढे पन्नास वर्षे टिकली. महाजनांनी मुंडे यांच्यातील नेतृत्वगुण हेरून त्यांना अखील भारतीय विद्यार्थी परिषदेशी जोडले. पुढे याजोडीने महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात अनेक आंदोलनात एकत्र भाग घेतला. दोघेही जनसंघाचे पूर्णवेळ कार्यकर्ते बनले. आणीबाणीला विरोध केल्याने गोपीनाथ मुंडे यांना कारावास भोगावा लागला. १९७८ साली मुंडे साहेब जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणून निवडून आले. त्यानंतर दोन वर्षांनी म्हणजे १९८० साली ते रेणापूर मतदारसंघातून पहिल्यांदा आमदार म्हणून निवडून आले. त्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. या दरम्यान त्यांनी भाजपला घराघरात पोहचवण्याचे काम केले. भाजप हा ब्राह्मणांचा पक्ष आहे. ही ओळख खोडून काढण्यासाठी त्यांनी महाराष्ट्रात 'माधव' चा प्रयोग केला आणि भाजपला बहुजनांचा पक्ष बनवला. गोपीनाथ मुंडे यांच्या प्रयत्नांमुळेच बहुजनवर्ग भाजपकडे वळला. गोपीनाथ मुंडे हे उत्कृष्ट वक्ते होते. आपल्या धारधार वक्तृत्वाने त्यांनी सभा गाजवायला सुरवात केली. विधिमंडळात असो की विधिमंडळाबाहेर सार्वजनिक सभेत असो मुंडे साहेब आपल्या वक्तृत्वाने श्रोत्यांची मने जिंकत असत. विरोधी पक्षात असूनही महाराष्ट्रातील सर्वाधिक लोकप्रिय नेत्यांत त्यांची गणना होऊ लागली. विरोधी पक्षनेते या नात्याने ते सत्ताधाऱ्यांवर तुटून पडायचे. १९९१ ते १९९५ या काळात ते विरोधी पक्षनेते असताना सत्ताधारी काँग्रेस पक्षाला त्यांनी सळो की पळो करून सोडले होते. १९९५ साली त्यांनी महाराष्ट्रभर दौरे करून जनमत तयार केले. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळेच १९९५ साली राज्यात युतीचे सरकार आले. या सरकारमध्ये ते उपमुख्यमंत्री बनले शिवाय गृहमंत्रीपदाची जबाबदारी देखील त्यांचावरच होती. गृहमंत्री म्हणूनही त्यांची कारकीर्द गाजली. गृहमंत्री असताना त्यांनी गुन्हेगारांविरुद्ध धडाकेबाज कारवाई केली. पोलिसांना अधिकार दिले. एन्काऊंटर हा शब्द तेंव्हाच रूढ झाला. मुंबईतून गँगवार हद्दपार करण्यासाठी त्यांनी पोलिसांना मोकळीक दिली. त्यांच्यामुळेच मुंबईतील गुन्हेगारी टोळ्या नष्ट झाल्या तर काहींनी देशाबाहेर पलायन केले. गोपीनाथ मुंडे हे कुशल प्रशासक तसेच समन्वयक देखील होते भाजप सेना युतीत तणाव निर्माण झाला की ते निवळण्याचे काम गोपीनाथ मुंडेच करायचे. त्यांचे आणि बाळासाहेबांचे खूप जवळचे संबंध होते. पुढे युतीची महायुती करण्याचे कामही त्यांनी केले त्यांच्यामुळेच राजू शेट्टी, रामदास आठवले, महादेव जानकर यासारखे नेते भाजपशी जुळले. २०१४ साली महाराष्ट्रात आणि केंद्रात सत्ता आणण्यासाठी त्यांनी खूप मेहनत घेतली. नरेंद्र मोदींच्या पहिल्या मंत्रिमंडळात ते कॅबिनेट मंत्री बनले. गोपीनाथ मुंडे हे अजातशत्रू व्यक्तिमत्त्व होते. ते भाजपचे असूनही विरोधी पक्षातील नेत्यांशी त्यांचे मैत्रीचे संबंध होते. विलासराव देशमुख आणि छगन भुजबळ यांच्याशी त्यांचे असलेले मैत्रीचे संबंध सर्वश्रुत आहे. २०१४ साली ते जेंव्हा केंद्रात कॅबिनेट मंत्री बनले तेंव्हा संपूर्ण महाराष्ट्राला आनंद झाला मात्र हा आनंद फार काळ टिकू शकला नाही. ३ जून २०१४ रोजी एका अपघातात त्यांचे निधन झाले आणि संपूर्ण महाराष्ट्र शोक सागरात बुडाला. लोकनेते गोपीनाथ मुंडे यांना पुण्यतिथीदिनी विनम्र अभिवादन !

# कृषिमंत्र्यांचे बेताल वक्तव्य... अजित दादा... कोकाटेंना आवरा...!



**- दिलीप देशपांडे**
**जामनेर, ८९९९५६६९१७**

निवडणुका येतात जातात. त्यानंतर सरकार स्थापन होते. त्यातच महाआघाडी महायुती करण्या करता काही महिने निघून जातात. निवडणुकीपूर्वी सर्वच पक्षांकडून वेगवेगळे आमिषे दाखवले जातात. आश्वासन दिली जातात. शेतकऱ्याला कर्जमाफी, पीक विमा, व्याज सवलत असे,तसेच शेतीच्या प्रगतीसाठी अनेक योजना जाहीर होतात. पण नंतर पुढे येणाऱ्या काळात सत्तेचे समीकरण बनवता बनवता या गोष्टीचा सोईस्कर पणे विसर पडतो. तसेच काहीसे आता झालेले आहे. सत्येवर पक्ष कोणताही असो परंतु दिलेल्या आश्वासनाची पूर्तता आणि कबुली ही द्यायलाच हवी नाहीतर केवळ ती फसवणूक झाली समजावे. अवर्षणग्रस्त आणि अतिवृष्टीने बाधित विभागाला पिक विमा चा भक्कम आधार देणे आवश्यक आहे. आताची परिस्थिती बघितली तर जिकडे तिकडे कर्जमाफी आणि पीक विम्यासाठी शेतकऱ्यांमध्ये असंतोष आहे. केवळ निवडणुका डोळ्यासमोर ठेवून हे सर्व केले जाते. आश्वासन देवूनही त्यानंतर आता बघा शेतकऱ्याला कर्जमाफी पीक विमा अनुदान यासाठी आंदोलन करावे लागत आहेत. अजूनही कर्जाच्या बोजामुळे खचून जाऊन शेतकऱ्यांच्या आत्महत्या होतच आहेत.

प्रहार संघटनेचे आमदार बच्चू कडू आक्रमक झाले आहेत. निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी जाहीर केली असून अद्याप त्याविषयी काहीही हालचाल नाही किंवा वक्तव्य नाही म्हणून कर्जमाफी मिळेपर्यंत त्यांनी आंदोलन करत आहेत. उद्योगपतींना काही लाख कोटींची कर्जमाफी होते पण शेतकऱ्याकडे आता दुर्लक्ष आहे म्हणून त्यांनी हे सरकारचा निषेध व्यक्त केला आहे.

शेतकरी ब्रिगेडचे,शेतकरी नेते प्रकाश पोहरे यांनीही कर्ज मुक्तीसाठी लढा उभारलेला आहे आणि शेतकऱ्यांकडून त्यासाठी अर्ज भरून घेत आहेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी कर्जमाफीचे आश्वासन जाहीरनाम्यातच दिले होते परंतु सरकारने अत्यांपर्यंत त्याविषयी काही विचार केला नाही अजित पवार तर म्हणाले आहेत आता कर्जमाफी देणे शक्यच नाही, आणि कर्जमाफी विषयी मी काही बोललो नाही.जे कोणी बोलले असतील त्यांना विचारा.

२५ वर्षांतील सर्वात मोठा पाऊस असल्याची नोंद घेण्यात आली आहे. विदर्भ,मराठवाडा, जालना,नासिक, खानदेशातील अनेक जिल्ह्यात सर्वाधिक पाऊस झाल्याची नोंद आहे. या पावसामुळे शेतीमालाचे मोठे नुकसान झाले आहे. तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. शेतकऱ्यांना सरकारकडून नुकसानभरपाई मिळेल, असा विश्वास वाटत आहे.

कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांविषयी अनेक वादग्रस्त आणि शेतकऱ्यांचा अवमान करणारी विधाने केलेली आहे.

कृषिमंत्री कोकाटे यांनी केलेल्या वादग्रस्त विधानामुळे नवा वाद उफाळण्याची शक्यता वर्तवली जात आहे. कोकाटे यांनी कर्जमाफीची रक्कम साखरपुडा,लग्नासाठी खर्च केली जाते, त्यातील एक रुपया तरी शेतीला लावता का ?असे वक्तव्य केले होते. आता भिकारी ही एक रुपया घेत नाही आम्ही एक रुपयात पिक विमा घेतो असेही वक्तव्य केले होते. आता भिकारी आणि शेतकरी हे वक्तव्य काय आहे काहीतरी असंबद्ध प्रकारचे वक्तव्य आहे.अवकाळी पावसामुळे झालेल्या नुकसानीची कृषी मंत्री कोकाटे यांनी पाहणी केली. त्यानंतर पत्रकारांशी बोलत असतानाच त्यांनी हे वक्तव्य केले. मंत्री कोकाटे म्हणाले की, नुकसानीचे पंचनामे सुरू असल्याचे सांगितले. तर शेतकऱ्यांचे असे म्हणणे आहे की, उभ्या पिकांचे पंचनामे केले जात आहेत, असे विचारले असता मंत्री कोकाटे म्हणाले की, कापणी झालेल्या पिकांचे पंचनामे करून काय होणार? ढेकळांचे पंचनामे करायचे का? जे नियमात बसेल त्याप्रमाणे करा पण किमान शेतकऱ्यांना डिवचवू नका आणि अपमान कारक बोलू नका. सवेदनशीलता असू द्या. शेतकऱ्यांशी बोलत असतानाही ते अतिशय त्रासिक पणे बोलत होते आणि हे त्यांचे चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होते. या आध सुध्दा एका राजकीय नेत्याने कितीही दिले तरी रडतात साले असे शेतकऱ्यांनचा अवमान करणारे वक्तव्य केले होते. कोणी आपल्या खिशातून काढून देत नाही.

महाराष्ट्रातील ७० टक्के शेतकरी कोरडावू शेती करणार आहे. त्याचे उत्पन्न तरी किती असते,? आणि त्याला भाव काय मिळतो ? उत्पन्न किती होते ? याचा काही विचार बोलताना करायला हवा. सर्वेक्षणानुसार महाराष्ट्रातील शेतकऱ्यांचे उत्पन्न दरम हा दहा ते अकरा हजार रुपयांच्या दरम्यान आहे. वर्षभरात जे काही थोडेफार उत्पन्न मिळते त्यातूनच त्याला संसाराचा खर्च, मुला मुलींचे शिक्षण, लग्न, आजारपण,सामाजिक कार्य, हे सर्वच करावे लागते आणि त्यासाठी त्याला काही वेगळा पैसा नसतो त्यामुळे आलेल्या पैशाचा नसतो हे सर्व करत असतो मग तो पैसा नुकसान भरपाईचा असो अनुदान असो व कर्जमाफी असो त्याचा कसा वेगळा हिशोब ठेवत नाही. त्याला काही भत्ते मिळत नाही की रगड पगार मिळत नसतो.प्रवास फुकटचा नाही. तेव्हा बोलणाऱ्यांनी मात्र याचा विचार करायला हवा आणि मगच बोलावे मग ते कोणीही असो. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या या विधानाबाबत जनमानसात शेतकरी वर्गात अतिशय चीड निर्माण झाली आहे. आणि संताप व्यक्त केला जात आहे. त्यांनी माफी मागवावी असा सवालही उपस्थित केला गेला आहे. कृषी मंत्री किती संवेदनशील असावे. इथे तर शेतकऱ्याच्या जखमेवर मीठ चोळले जात आहे आता कोकाटे यांनी वादग्रस्त वक्तव्य केले आहे. या वक्तव्यावर शेतकरी संघटनांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत.

शेतकऱ्यांची अवहेलना करू नका. शेतकऱ्यांना मदत करता आली नाही तरी चालेल मात्र वारंवार बळीराजाचा अपमान होता कामा नये. केवळ सत्तेच्या मुजोरीतून हा अपमान केला जात आहे. पुन्हा बळीराजाला असे काही बोललल्यास रांगड्या भाषेत उत्तर दिले जाईल.

माननीय मुख्यमंत्री, यांनी कर्जमाफी आणि नुकसान भरपाई झालेल्यांना पिक विमा रक्कम तसेच नियमित कर्ज फेड करणाऱ्यांना अनुदान देण्याविषयी काय धोरण आहे याविषयी पूर्तता करावी म्हणजे.गत वर्षी झालेल्या अतिवृष्टीचे विमा नुकसान भरपाईचे पैसे अध्यक्ष शेतकऱ्यांना मिळालेले नाहीत. शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला असंतोष कमी होईल. निवडणूक आधी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता होणे महत्त्वाचे आहे तसेच शेतकऱ्यांविषयी बेताल वक्तव्य करणारांना त्यांनी मंत्रिमंडळ बैठकीत सूचना देणे आवश्यक आहे.मा. देवेंद्र फडणवीस साहेब ती करतील ही अपेक्षा आहे.

**बळीराजा वाचला तर शेती फुलेल.**
**बळीराजाने नाही केला पेरा तर काय खाल धतुरा**

### खरा आनंद

कोणाला कशाचा आनंद
तर कोणाला कशाचे सुख
प्रत्येकाची आवड वेगळी
सुखाची कल्पना आगळी

कोणाला चहाडी करण्याचे सुख
कोणाला कुकर्माने मिळे सुख
कोणी व्यसनात नेहमी झिंगतो
कोणी भ्रष्टाचार सहज करतो

कोणाला खेळ खेळण्याचा आनंद
कोणाला थापा मारण्याचा आनंद
कोणी सट्टा लावून पैसा कमावतो
कोणी मटक्यात पैसा बुडवतो

कोणाला राजकारणाचा आनंद
कोणाला टिका करण्याचा आनंद
कोणी भाषण जोरात करतो
कोणी गोड आवाजात गातो

कोणाला ऐट दाखवण्याचा आनंद
कोणाला साधे राहण्याचा आनंद
कोणी गडगंज संपत्ती कमावतो
कोणी समाजकारणात रमतो

कोणाला वाद घालण्याचा आनंद
कोणाला खोटे बोलण्याचा आनंद
कोणी निलाजरा व्याभिचार करतो
कोणी चारित्र्याला जीवापाड जपतो

खरा आनंद कशाने मिळतो
अजुनही कोणाला कळले नाही
खरे सुख शोधण्याच्या नादात
जीवन जगावे कसे कळले नाही

**- बबन दामोदर गुळवे**
**जि.लातूर.मो.९५४५४४२६४८**

## वाचक पत्र




### पर्यावरणप्रेमाचे धडे फक्त एका समाजालाच ?

देशासह राज्यात उद्योगधंद्यांना जशी चालना मिळत गेली तशी प्रदूषणामध्येही वाढ होत गेली. कारखान्यांमधील दूषित आणि रासायनिक द्रव नद्यांमध्ये वर्षभर सोडल्याने होणाऱ्या जलप्रदूषणाच्या तुलनेत गणेशमूर्ती विसर्जनाने होणारे प्रदूषण नगण्य असतानाही तथाकथीत पर्यावरणप्रेमी आणि स्वतःला पुरोगामी म्हणवून घेणारी मंडळी नैसर्गिक प्रवाहांत गणेशमूर्ती विसर्जनाला विरोध करतात. हिंदू समाजाने पर्यावरणाला नेहमीच आदरस्थानी मानल्याने घरी मातीची गणेशमूर्ती बसवणाऱ्यांचे प्रमाण आज कमालीचे वाढले आहे. दिवाळी जवळ आली की पर्यावरणप्रेमी फटाके न फोडण्याचे आवाहन करतात. हिंदूंनी याचेही स्वागत करून गेल्या काही वर्षांत मोठ्या आवाजांपेक्षा शोभेच्या फटाक्यांना अधिक पसंती दिली आहे. होळीला केवळ सुकी लाकडे जाळली जातात तर रंगपंचमीच्या दिवशीही पाण्याचा कमीतकमी वापर करून सुक्या रंगाने होळी साजरी करण्याचा प्रयत्न करतात. एकूणच पर्यावरणप्रेमींच्या प्रत्येक सूचनांचे हिंदूंनी स्वागतच केले आहे. मात्र हेच पर्यावरणप्रेमी बकरी ईदच्या दिवशी लाखो जनावरांची कत्तल केली जाते, सांडलेले रक्त धुऊन काढण्यासाठी कोट्यवधी लिटर पाणी वापरले जाते तेव्हा कुठे असतात ? पर्यावरणप्रेमाचे धडे यांना का दिले जात नाहीत ? आजमितीला राज्यातील कितीतरी गावे दुष्काळाचा सामना करत आहेत. वरुणराजाचे आगमन यंदा लवकर झाले असले तरी राज्यातील दुष्काळ संपवेल का याचा काहीच नेम नाही. पाणी वाचवण्याचे, पाणी साठवण्याचे धडे प्रशासनाकडून वर्षभर दिले जातात मग बकरी ईदनिमित्त होणाऱ्या पाण्याच्या अपव्ययाकडे का दुर्लक्ष केले जाते ? पर्यावरण रक्षणासाठी झटणारी मंडळी मुस्लिम बांधवांना इको फ्रेंडली बकरी ईद साजरी करण्याचे आवाहन केव्हा करणार ?

**- सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## मानसी हाइट्स सोसायटीत ज्येष्ठ नागरिकांचा वाढदिवस साजरा



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.०१, डोंबिवली :** मानसी हाइट्स सोसायटीत १ जून रोजी ज्येष्ठ नागरिक पुरुष व महिलांचा वाढदिवस अत्यंत उत्साहात व आनंददायी वातावरणात साजरा करण्यात आला. लहानपण आणि म्हातारपण या दोघांमध्ये साम्य असते – लहानपणात मिळणाऱ्या लाडाचे सुख म्हातारपणातही लाभावे, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

मानसी हाइट्स ही केवळ एक सोसायटी नसून एक कुटुंबच आहे. हे या कार्यक्रमातून पुन्हा एकदा अधोरेखित झाले. ज्येष्ठ नागरिकांचे मनोबल वाढवावे, त्यांना सन्मानाची जाणीव व्हावी, यासाठीच या उपक्रमाची कल्पना राबविण्यात आली.

कार्यक्रमात सहभागी झालेल्या ज्येष्ठ महिलांमध्ये समिधा निखार्गे, कमल खिलारी, शोभा गायकवाड, निना मालवणकर यांचा समावेश होता. तर पुरुष ज्येष्ठ नागरिकांमध्ये हेमंत इनामदार, हेमंत सोनावणे, जयवंत यादव, नंदू राजपूत, शंकर बंगेरा, लोकेश शेट्टी, विलास भगत, भरत सरमळकर, मनोहर महाडिक, आणि मारुती सुतार यांची उपस्थिती लाभली. सर्वांनी मिळून केक कापून वाढदिवस साजरा केला आणि आनंद व्यक्त केला.

या प्रसंगी उपस्थित सर्व ज्येष्ठ नागरिकांचे मन:पूर्वक आभार मानण्यात आले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी तरुण वर्गणी सभेतील प्रमोद खिलारी, केतन माने, संकेत निखार्गे, संजय मोरे, संजय अंगाने, पूनम खिलारी, सोहम पवार आणि जब्बार खान यांनी पुढाकार घेतला आणि एक जूनच्या महत्त्वाची जाणीव सर्वांना करून दिली. हा उपक्रम एक आदर्श घालून देणारा ठरला असून, ज्येष्ठ नागरिकांना दिलेल्या या आदराने सोसायटीतील कुटुंबभावना अधिक घट्ट झाली आहे.

## पनवेल महानगरपालिकेत 'लोकशाही दिन' संपन्न



**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०२, पनवेल :** सर्व सामान्य जनतेच्या तक्रारी व समस्या तत्परतेने सोडविण्यासाठी पनवेल महानगरपालिकेच्या मुख्यालयातील बैठक कक्षामध्ये आज दिनांक ०२ जून रोजी आयुक्त मंगेश चितळे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये 'लोकशाही दिनाचे' आयोजन करण्यात आले.

आजच्या बैठकित नागरी सेवा सुविधा, बांधकाम विभाग अशा विविध विभागाचे पाच अर्ज दाखल झाले होते, यावेळी नागरिकांच्या समस्या तातडीने सोडविण्यात आल्या.

या कार्यक्रमास परिवहन विभाग व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त डॉ.वैभव विधाते, स्वरूप खारगे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख किर्ती महाजन, कार्यकारी अभियंता सुधीर सांळुखे, विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

नागरिकांच्या तक्रारी, अडचणी सोडविण्यासाठी प्रशासन आणि नागरिकांमध्ये संवादवाढीसाठी महापालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येत आहे. नागरिकांनी आपले वैयक्तिक अर्ज समन्वय अधिकाऱ्यांकडे पंधरा दिवस आधी द्यावेत. तसेच संबंधित नागरिकांनी लोकशाही दिनादिवशी उपस्थित रहावे.

## ईटकूरला वारकरी दिंडीच्या माध्यमातून अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन





**अक्षराज : विश्वास वराळे**

**दि.०२, कळंब (धाराशिव) :** कळंब तालुक्यातील ईटकूर येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली.

विठ्ठल रुक्मिणी मंदिरात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सर्वप्रथम अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन ह.भ.प बाबुराव महाराज देशमुख यांच्या हस्ते प्रतिमा पुजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला. 'डिजे'ला फाटा देत पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांच्या प्रतिमेची टाळ मृदुंगाच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. व शेवटी अहिल्यादेवी होळकर जयंती उत्सव समितीच्या वतीने महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

यावेळी माऊली वारकरी शिक्षण संस्थेचे ह.भ.प लाखे महाहाराज, हभप बाळासाहेब माने, बालाजी आण्णा आडसुळ, सचिन गंभिरे, अभिषेक गुजर, मोहरबाई कस्पटे लक्ष्मण आडसुळ, हरिदास पावले, अभयसिंह आडसुळ, बिभीषण देसाई, देविदास गायके, सुरेश लोंढे, नानासाहेब कवडे, अशोक शिंपले, रितेश लगाडे, आकाश दाणे, मारुती गायके जयदेव गंभिरे, बंडु बावळे, किरण आडसुळ हनुमंत आडसुळ, बाळासाहेब माने, सतिश कस्पटे, श्रीराम वाघमारे गणेश गिरे आकार दाने, दादा कस्पटे, सुशिल कस्पटे, प्रमोद गिरे, अर्जुन गिरे, राजेंद्र घाटूळे, हनुमंत कस्पटे, केशव कस्पटे, पत्रकार बालाजी देसाई पत्रकार संतोष गिरे श्रीमंत कस्पटे दिलीप कस्पटे चंद्रकांत कस्पटे सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**'डिजे' ला फाटा देत टाळ मृदंगाच्या गजरात मिरवणूक वारकरी दिंडीने गावकऱ्यांचे वेधले लक्षमाऊली वारकरी शिक्षण संस्थेनेच्या बाल वारकऱ्यांचे ईटकूरकरांनी केले कौतुक.**

# कोकणातील लोककलावंतांची मुंबई स्वच्छतेवर जनजागृती

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.०२, मुंबई :** मुंबई महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापनासाठी विविध उपाययोजनांचे धोरण आखत असून मुंबई महानगरपालिका अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन विभागातर्फे घनकचरा व्यवस्थापन समिती वतीने मुंबई शहरात माझी मुंबई स्वच्छ मुंबई अभियान राबविण्यात येत असून मोठ्या प्रमाणात जागरूकता मोहीम हाती घेण्यात आली आहे.

सदर जनजागृती मोहिमेकरीता वैजयंती आपटे यांच्या माध्यमातून कोकणातील कलाकारांना स्वछ मुंबईपर पोवाडा आणि भारूड लोककला सादरीकरणाची संधी देण्यात आली असून महाराष्ट्र गौरव भूषण शाहीर मधुकर पंदेरे, तुषार पंदेरे, बिनेश वाजे, सचिन धूमक, सुरेश राऊत, कु. प्रीती शिगवण, ढोलकिपट्टू अपूर्व झाडेकर, बेंजो विशाल बंदरकर,प्याड वादक चेतन इंगळे आणि संच आदी



कलाकार सदर जनजागृती मोहिमेत सहभागी होत शनिवार दिनांक : ३१ मे २०२५ रोजी मुंबईतील धारावी कुंभारवाडा येथे घनकचरा विभाग व्यवस्थापन वतीने मुंबईतील कचऱ्याचे नियोजन कार्यपद्धती, कचरा कंपोस्ट करणे आणि ऊर्जा निर्मितीसाठी वापरणे, घरी कचरा उदा. सेंद्रिय, प्लास्टिक, कागद, अन्य ओला-सुखा घटक कचरा वर्गीकरण करणे आदी विषयी कोकणातील ह्या कलाकारांनी पोवाडा आणि भारूड ह्या लोककलांच्या माध्यमातून जनजागृती केली.

मुंबई महानगरपालिकेच्या वतीने शाळा, कॉलेज, सार्वजनिक ठिकाणी कचरा संकलन विषयी जनजागृती मोहीम गतिशील करण्यात आली आहे. प्रसंगी मनपाचे धारावी घनकचरा विभागाचे पेंडल, गौडार आदी अधिकारी उपस्थित होते. कोकणातील जास्तीत जास्त कलाकारांनी शासनाच्या आणि प्रशासन विभागाच्या वतीने विविध ठिकाणी राबविण्यात येणाऱ्या मोहिमेत सहभागी होऊन एक सुजाण नागरिक म्हणून आपलं सामजिक कर्तव्य पार पाडून प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन शाहीर तुषार पंदेरे यांनी केले आहे.

# दापोली तालुक्यात आपत्ती व्यवस्थापनासाठी मोठे पाऊल...

## दापोलीत बुरोंडी येथे करण्यात आले चक्रीवादळ निवारा केद्रांच भुमिपुजन

**अक्षराज : उमेश तबिब**

**दि.०२, दापोली (रत्नागिरी) :** आज बुरोंडी येथिल सर्वे नं.४१/२२ येथे कोकण आपत्ती सौम्यीकरण प्रकल्पांतर्गत मंजूर झालेल्या चक्रीवादळ निवारा केंद्र उभारणीचा भूमिपूजन सोहळा योगेश कदम यांच्या हस्ते पार पडला.

मागील चक्रीवादळात झालेली हानी व अनुभवलेल्या परिस्थितीशी झुंजत आजही आपण त्यातून सावरतोय.तीच हानी लक्षात घेता या पुढे अशी परिस्थिती निर्माण झाल्यास नागरिकांना वेळेवर सुरक्षित मदत मिळावी या करिता सुरक्षेचा भक्कम आधार निर्माण म्हणून हा महत्त्वपूर्ण प्रकल्प राबवण्यात येत आहे. यामुळे नैसर्गिक आपत्तींच्या काळात नागरिकांना सुरक्षित निवारा उपलब्ध होणार आहे.

जनतेच्या सुरक्षेसाठी हा प्रकल्प अत्यंत आवश्यक आहे. आपत्तीला रोखता येत नाही, पण योग्य नियोजन आणि मजबूत अधोसंरचनेच्या आधारे नुकसान नक्कीच टाळता येते. अशी भावना यावेळी योगेशदादा कदम यांनी व्यक्त केली.

आपत्ती काळात लोकांना स्थलांतरीत केल्यानंतर सदर इमारतीचा आसरा देण्यासाठी उपयोग होणार असुन या शेल्टर हाऊससाठी अंदाजपत्रकीय रक्कम ₹ १६ कोटी ६९ लाख असुन २० गुंठे जागेत या प्रकल्पाची उभारणी करण्यात येणार आहे ही फक्त सुरुवात असुन भविष्यात अशा आणखी प्रकल्पांद्वारे कोकणाचा सुरक्षित व शाश्वत विकास सुनिश्चित केला जाईल अस अभिवचन त्यांनी यावेळी दिले.

याप्रसंगी माजी समाजकल्याण सभापती भगवान घाडगे, दापोली विधानसभा क्षेत्रप्रमुख किशोर देसाई, विधानसभा संघटक प्रदीप सुर्वे, सरपंच प्राची म्हातले, उपसरपंच प्रदीप राणे, युवासेना उपजिल्हा संगटक अमित पारदुले, मा.तहसिलदार मॅडम, प्रांत साहेब, माजी सभापती चंद्रकांत बैकर, माजी उपसभापती दिपक घडशे आदी मान्यवर मंडळी आणि युवासेना, महीला आघाडी, महीला मंडळ, महायुतीचे पदाधिकारी तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

# विद्यार्थी शिक्षणासोबत सुसंस्कारित बनला पाहिजे - सुबोध काकानी

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०२, कुंडलवाडी (नांदेड) :**

आजच्या काळातील प्रत्येक विद्यार्थी शिक्षण तर घेतलेच पाहिजे या शिक्षणासोबत विद्यार्थी हा सुसंस्कारित देखील बनला पाहिजे यासाठी आमच्या राजाराम काकांनी सहकार विद्या मंदिरात आम्ही विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत अनेक प्रकारचे संस्काराचे धडे आमच्या विद्यालयात देत असतो असे प्रतिपादन राजाराम काकांनी सहकार विद्या मंदिर धर्माबाद या संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक सुबोध काकानी यांनी केले.

ते कुंडलवाडी येथील साईबाबा मंदिरात विद्यालयातर्फे आयोजित पालकांच्या मार्गदर्शन सत्रात कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून बोलत होते. या पालक सभा मार्गदर्शन सत्राच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे व्यवस्थापकीय संचालक सुबोध काकानी हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून धर्माबाद येथील प्रतिष्ठित व्यापारी शुक्लाजी,



कुंडलवाडी सेवा सोसायटीचे माजी चेअरमन साईनाथ उत्तरवार, पानसरे महाविद्यालयाचे उपाध्यक्ष राजेश्वर उत्तरवार, भारतीय जनता पार्टी व्यापारी आघाडीचे जिल्हा उपाध्यक्ष दिनेश दाचावार,मराठी पत्रकार संघ कुंडलवाडी चे अध्यक्ष सुभाष दरबस्तेवार यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना काकानी म्हणाले की, पालकांना आजच्या बदलत्या शिक्षणाचे महत्त्व व सीबीएससी अभ्यासक्रम महत्व पटवून देण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करत आहोत .आमच्या संस्थेत गेल्या वर्षीपासून सीबीएससी अभ्यासक्रम सुरू झालेले आहे. या अभ्यासक्रमाचे महत्त्व पटवून देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. बरेचसे पालक या अभ्यासक्रमासाठी नांदेड, हैदराबाद औरंगाबाद येथे स्थलांतरित होताना दिसून येत होते. त्यांची अडचण लक्षात घेता अत्यंत अल्प दरात व सुशिक्षित शिक्षकांना घेऊन आम्ही धर्माबाद सारख्या शहरात सीबीएससी शिक्षण देत आहोत.

या संधीचा फायदा पालकांनी जरूर घेतला पाहिजे.आमच्या विद्यालयात केवळ शिक्षण नाही तर शिक्षणासोबत मुलांना सुसंस्कारित घडवण्यासाठी आम्ही इतर अनेक उपक्रम राबवित असतो. याप्रसंगी साईनाथ उत्तरवार, राजेश्वर उत्तरवार, सौ.निता दरबस्तेवार,प्राचार्य सौरभ सक्सेना,शाळेचे संचालक सुनील श्रीवास्तव यांचेही मार्गदर्शन पर भाषणे झाली. या कार्यक्रमात कुंडलवाडी येथील कु. श्रुतिका साहेबराव गादगे, कु. हंसिका शंकर नीलपवार, सुशील बसवेश्वर चेटलुरे, शशांक लक्ष्मण मंदारगे हे विद्यार्थी इयत्ता दहावी परीक्षेत सुंदर रित्या गुणदान घेऊन उत्तीर्ण झाल्यामुळे सुबोध काकानी यांच्या हस्ते विद्यार्थी व पालकांचे अभिनंदन व कौतुक करण्यात आले. या पालक सभेत कुंडलवाडी व परिसरातील पालक, प्रतिष्ठित नागरिक, पत्रकार बहुसंख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संध्या देशपांडे यांनी केले तर उपस्थितांचे आभार श्रुतिका देशमुख यांनी मानले. कार्यक्रमाची सांगता शेवटी सुरूची अल्पोपहाराने झाली.

# ३ महिन्याच्या अपहरत बाळाची पनवेल पोलिसांकडून २४ तासात सुटका

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०२, पनवेल :** पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीतील पनवेल रेल्वे स्टेशनच्या बाहेरुन दिनांक ३० मे २०२५ रोजी १५.०० वा. ते १५.३० वा. च्या दरम्यान ३ महिन्यांच्या बाळाचे कोणीतरी अज्ञात इसमाने अपहरण केले म्हणुन पनवेल शहर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. २९२/२०२५ बीएनएस १३७ (२) (आयपीसी ३६३) प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

सदरचा प्रकार हा संवेदनशील व गंभीर स्वरुपाचा असल्याने तात्काळ यातील अपहृत बाळ व आरोपीताचा शोध घेणेकामी पनवेल शहर पोलीस ठाण्याकडुन ५ पथके तयार करण्यात आली. सदर पथकाने पनवेल रेल्वे स्टेशन परिसरातील सीसीटिव्ही फुटेज तपासले असता एक महिला ही यातील अपहृत बाळासह पुण्याच्या दिशेने जाणाऱ्या रेल्वेमध्ये बसताना दिसून आली. त्यावरुन सदर आरोपीता व अपहृत बाळाचा शोध घेणे कामी कर्जत, लोणावळा, दौंड, पुणे येथे पथके रवाना केली. सदर पथकांनी केलेल्या तपासामध्ये यातील आरोपीता ही पोलीसांना गुंगारा देण्यासाठी लोणावळा येथून रेल्वेने पुन्हा पनवेल च्या दिशेने आल्याचे दिसून आले. मिळालेल्या माहितीच्या आधारे पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या आजु




बाजुच्या पोलीस ठाण्यास गुन्ह्याच्या घटनेबाबत माहिती देऊन यातील अपहृत बाळ व आरोपीतेचा शोध घेणेबाबत कळवण्यात आले होते.

गुन्ह्याच्या तपासा दरम्यान कळंबोली पोलीस ठाण्याचे वपोनि राजेंद्र कोते यांनी पनवेल शहर पोलीस ठाण्यास कळवले की, त्यांच्या पोलीस ठाण्याच्या नेमणुकीस असलेल्या सपोनि तृप्ती शेळके या कळंबोली सर्कल कडून कळंबोली पोलीस ठाण्याकडे येते असताना त्यांना यातील आरोपीता ही अपहृत बाळासह कळंबोली फायर ब्रिगेड जवळ दिसून आल्याने त्यांनी आरोपीतेस ताब्यात घेऊन अपरहत बाळाची सुटका केली असल्याचे कळवले. त्यावरुन तात्काळ पनवेल शहर पोलीस ठाण्याकडील अधिकारी व अंमलदार यांनी कळंबोली पोलीस ठाणे येथुन अपहृत बाळ व आरोपीतेस पनवेल शहर पोलीस ठाणे येथे घेऊन आलेले आहेत. त्यानंतर अपहृत बाळास सुखरुप तिच्या आईच्या ताब्यात दिलेले आहे. यातील आरोपीता नामे रोशनी विनोद वागेशी वय ३५ वर्षे, राह. पनवेल रेल्वे स्टेशन समोरील झोपडपट्टी, पनवेल ही पनवेल शहर पोलीसांच्या ताब्यात असुन गुन्ह्याचा पुढील तपास चालू आहे.

सदरचा गुन्हा उघडकीस आणण्यासाठी मिलिंद भारंबे, पोलीस आयुक्त, नवी मुंबई; संजय ऐनपुरे, पोलीस सह आयुक्त नवी मुंबई; प्रशांत मोहीते पोलीस उपायुक्त परि. ०२, पनवेल, नवी मुंबई; अशोक राजपुत, सहा. पोलीस आयुक्त पनवेल विभाग, नवी मुंबई यांच्या मार्गदर्शनाखाली, पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि नितीन ठाकरे, पोनि (गुन्हे) शाकीर पटेल, पोनि (प्रशा) अभिजीत अभंग, सपोनि प्रकाश पवार, सपोनि तृप्ती शेळके (नेम-कळंबोली पोलीस ठाणे), पोउपनि विनोद लभडे, पोउपनि अंकुर शेलार, पोउपनि उद्धव सोळंके, पोहवा/१८५१ महेंद्र वायकर, पोहवा/ १६२० अमोल डोईफोडे, पोहवा/ १३७८ गंथडे, पोहवा/ २२२८ अमोल पाटील, पोहवा/ २१०३ बोरसे, पोहवा/ ९९ महेश पाटील, पोशि/ किरण कराड, पोशि/ विशाल दुधे, पोशि/ नितीन कांबळे यांनी उल्लेखनीय कामगिरी केलेली आहे.

# जाधवर इन्स्टिट्यूटस्तर्फे ६ वा कीर्तन महोत्सव

## ह.भ.प.अमृताश्रम महाराज स्वामी जोशी यांना यंदाचा कीर्तन महर्षी पुरस्कार

**अक्षराज : स्वामी दळवी**

**दि.०२, खडकवासला (पुणे) :** शालेय विद्यार्थी, तरुणाई, पालक व नागरिकांना कीर्तनाद्वारे प्रबोधनाकरीता न-हे येथील जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटयूटस् तर्फे सहाव्या कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये महाराष्ट्रातील चार दिग्गज कीर्तनकार कीर्तन करणार असून दिनांक ३ ते ६ जून दरम्यान दररोज सायंकाळी ७ वाजता न-हे येथील प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर शैक्षणिक संकुल १ च्या प्रांगणात कीर्तन होणार असल्याची माहिती इन्स्टिटयूटस्चे उपाध्यक्ष ॲड.शार्दुल जाधवर यांनी दिली.

कीर्तन महोत्सवाचे उद्घाटन मंगळवार, दिनांक ३ जून रोजी सायंकाळी ६ वाजता होणार आहे. दररोज सायंकाळी ६ ते ७ यावेळेत हरिपाठ होणार असून मंगळवारी (दि.३), सायंकाळी ७ वाजता ह.भ.प. सुनील महाराज निवंगुणे यांचे कीर्तन होणार आहे. दुस-या दिवशी बुधवारी (दि.४) सायंकाळी ७ वाजता ह.भ.प. अमृताश्रम महाराज स्वामी जोशी यांचे कीर्तन होणार आहे. यंदाचा कीर्तनकेसरी पुरस्कार अमृताश्रम महाराज स्वामी जोशी यांना प्रदान करण्यात येणार आहे.




तिस-या दिवशी गुरुवारी (दि.५) सायंकाळी ७ वाजता ह.भ.प. संतोष महाराज पायगुडे यांचे कीर्तन होणार आहे. महोत्सवाचा समारोप शुक्रवार, दिनांक ६ जून रोजी सकाळी १० वाजता शिवशंभु व्याख्याते, भागवत कथाकार ह.भ.प.गुरुवर्य राजेंद्र महाराज येप्रे यांचे काल्याचे कीर्तन होणार आहे. महोत्सवाची सांगता दुपारी १२ ते २ यावेळेत महाप्रसादाने होणार आहे. ह.भ.प.येप्रे महाराज साधक वर्ग आणि समस्त ग्रामस्थ न-हेगाव यांनी संयोजनात सहभाग घेतला आहे.

ॲड.शार्दुल जाधवर म्हणाले, शिक्षणमहर्षी प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर यांच्या वाढदिवसानिमित्त जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटटस्च्या वतीने या सहाव्या कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यार्थी व तरुणवर्गाला आपल्या परंपरा, कला व संस्कृतीचे दर्शन व्हावे, याकरीता असे उपक्रम घेतले जातात. https://youtube.com/c/JadhavarGrupAdvShardulraoSudhakarA°aoJadhavar या लिंकवरुन कीर्तनांचा आनंद घेता येईल.

# समृद्धी महामार्गाच्या अखेरच्या टप्प्याचे गुरुवारी होणार लोकार्पण

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०२, मुंबई :** महाराष्ट्र सरकारचा बहुचर्चित महत्त्वकांक्षी प्रकल्प हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाच्या अखेरच्या टप्प्याच्या लोकार्पणाचा मुहूर्त आता ठरला आहे. कित्येक दिवसांपासून महामार्गाच्या उद्घाटनाचा मुहूर्त बदलत होता. अखेर आता येत्या गुरूवार, दिनांक ०५ जून २०२५ रोजी पासून नागपूर ते मुंबई विना अडथळा प्रवास करणे शक्य होणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गुरुवार, दिनांक ०५ जून २०२५ रोजी समृद्धी महामार्गाच्या बहुप्रतीक्षित शेवटच्या टप्प्याचे इगतपुरी येथील दिमाखदार सोहळ्यात लोकार्पण केले जाणार आहे.



नागपूर ते मुंबई समृद्धी महामार्गावरील इगतपुरी ते आमणे या ७६ किमी टप्प्याच्या लोकार्पण यादिवशी करण्यात येणार आहे. समृद्धी महामार्गाचा इगतपुरी-आमणे टप्पा ५ जून रोजी वाहतुकीसाठी खुला होत असल्याने या महामार्गावरील एक महत्त्वाचा टप्पा, इगतपुरी ते आमणे दरम्यानचा ७६ किलोमीटरचा मार्ग अखेर वाहतुकीसाठी खुला होणार आहे. लोकार्पणानंतर लगेचच हा मार्ग सामान्य वाहतुकीसाठी सुरू होईल.

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळाने (एमएसआरडीसी) बांधलेला ७०१ किलोमीटर लांबीचा हा समृद्धी महामार्ग मुंबई आणि नागपूर या दोन प्रमुख शहरांमधील प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी करणार आहे, ज्यामुळे प्रवासाचे १६ तास केवळ ८ तासांवर येणार आहेत. या महामार्गापैकी नागपूर ते इगतपुरी असा ६२५ किलोमीटरचा टप्पा सध्या वाहतुकीसाठी उपलब्ध आहे.एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांनी दिलेल्या माहितीनुसार, इगतपुरी ते आमणे या उर्वरित टप्प्याचे काम एप्रिल महिन्यातच पूर्ण झाले होते. आता ०५ जून २०२५ रोजी या अंतिम टप्प्याचे लोकार्पण होऊन संपूर्ण समृद्धी महामार्ग लवकरच पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होण्यास मदत होईल. ज्यामुळे राज्याच्या विकासाला गती मिळेल. हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाचे टप्प्याटप्प्याने उद्घाटन करण्यात येत आहे.

७०१ किलोमीटर लांबीपैकी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग हा नागपूर ते भरवीर, ता इगतपुरी (६०० कि.मी) वाहतुकीस खुला करण्यात आला. त्यानंतर समृद्धी महामार्गाच्या शिर्डी ते भरवीर (ता.इगतपुरी) या ८० किलोमीटर लांबीच्या दुसऱ्या टप्प्याचे लोकार्पण झाले. मग समृद्धी महामार्गाच्या भरवीर ते इगतपुरी या तिसऱ्या टप्प्याचे लोकार्पण झाले. पण समृद्धी महामार्गाच्या अंतिम टप्प्याच्या लोकार्पणाला अद्यापही मुहूर्त मिळत नाहीये.

**१ मे रोजीचा मुहूर्त हुकला -** सुरुवातीला विधानसभा निवडणुकीपूर्वी इगतपुरी ते आमणे हा शेवटचा टप्पा वाहतुकीसाठी खुला करण्याचं नियोजन होते. मात्र, खर्डी येथील एका १. ५ किलोमीटर लांब पुलाचे काम पूर्ण न झाल्याने हा मुहूर्त हुकला. यानंतर समृद्धी महामार्गाच्या अंतिम टप्प्याचे आमणेपर्यंतचे ७६ कि.मी. काम तत्परतेने पूर्ण करुन फेब्रुवारीपर्यंत हा महामार्ग पूर्णपणे खुला करावा असे निर्देश देण्यात आले होते.

त्यानंतर एप्रिल महिन्यात अंतिम टप्पा वाहतुकीसाठी खुला होईल असे बोलले जात होते. त्यानंतर ०१ मे २०२५ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचत्या हस्ते अंतिम टप्प्याचे लोकार्पण होणार असल्याचं वृत्त समोर आले. पण १ मे रोजीचा मुहूर्त हुकला आहे.

# जीएस महानगर बँक गीतांजली शेळके यांच्या ताब्यात

## सर्व १८ जागांवर दणदणीत विजय

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०२, अहिल्यानगर :** राज्यातील अगग्रण्य सहकारी बँक म्हणून ओळख असलेल्या जीएस महानगर बँकेची सत्ता एकहाती खेचून आणण्यात गीतांजली उदयराव शेळके यांना यश आले. त्यांच्या नेतृत्वाखालील मंडळाचे सर्वच्या सर्व उमेदवार एकूण मतदानाच्या ८० टक्के मिळवून विजयी झाले.

विरोधी सुमनताई शेळके यांच्या मंडळाचा सभासदांना धुव्वा उडवला आणि गीतांजली शेळके यांच्या मंडळावर मतांचा वर्षाव करत त्यांच्या ताब्यात बँक दिली. १८ जागांवर दणदणीत विजय मिळवताना गीतांजली शेळके यांच्या मंडळाची एक जागा आधीच बिनविरोध निवडून आली होती.



गीतांजली शेळके यांच्यावर सभासदांनी मोठा विश्वास व्यक्त केल्याचेच यातून स्पष्ट झाले असून या एकतर्फी विजयाच्या त्याच शिल्पकार असल्याचे अधोरेखीत झाले आहे. संचालक मंडळ निवडणुकीच्या मतदानासाठी ६९ हजार ४२१ मतदार पात्र होते.

**विजयी उमेदवार**

**सर्वसाधारण मतदारसंघ** - गीतांजली उदयराव शेळके, सचिन सीताराम अडसूळ, रविंद्र दत्तात्रय ढोले, गणेश सावकार गुंजाळ, भास्कर बाबाजी कवाद, सतिश अनंत खणकर, कुंदा भास्कर खोसे, मंगेश नारायण खोसे, श्रीधर कोंडीराम कोठावळे, बबन भाऊ लंके, संतोष किसन पठारे, शंकर पांडुरंग शिंदे, पांडुरंग विष्णू शिंदे, मंगल भाऊसाहेब थोरात

**महिला राखीव** - गीतांजली उदयराव शेळके, छाया रामदास वाढवणेइतर

**मागास** - भिवाजी भागुजी थोरात

**भटक्या विमुक्त जाती** - जमाती - विलास दगडू पावले

**अनुसूचित जाती जमाती** - संतोष भाऊराव रणदिवे (बिनविरोध)

त्यापैकी रविवारी झालेल्या मतदानात १७ हजार ६८१ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. एकूण मतदानाच्या टक्केवारीनुसार झालेले मतदान हे अवघे २५.४७ झाले होते. निवडणूक निर्णय अधिकारी नितीन काळे यांच्या उपस्थितीत सकाळी मतमोजणीस प्रारंभ झाला. सर्वात आधी सर्वसाधारण मतदारसंघाची मतमोजणी सुरु करण्यात आली. सर्व साधारण मतदारसंघात गीतांजली शेळके यांच्या नेतृत्वाखालील पॅनलचे सर्व उमेदवार हे अंशी टक्के मते मिळवून आघाडीवर राहिले. म्हणजेच सुमनताई शेळके यांच्या मंडळाला वीस टक्केच्या आसपास मतदान झाले. यानंतर महिला आणि अन्य मतदारसंघाची मतमोजणी झाली. येथे देखील हे प्रमाण ८० टक्के असेच राहिले. एकूणच ही निवडणूक गीतांजली शेळके यांनी एकहाती जिंकल्याचे स्पष्ट झाले.

# आरजेएमडीएस इंग्लिश शाळेच्या विद्यार्थ्यांची कराटे स्पर्धेत नेत्रदिपक यश

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०२, मुंबई :** श्रीलंका (कोलोंबो) येथे नुकत्याच झालेल्या ९ व्या एशिया गोजु रयु कराटे चँम्पियनशिप स्पर्धेत रत्नागिरी जिल्हा मराठा ज्ञाती समाज मुंबई संचालित आरजेएमडीएस इंग्लिश स्कुल, जोगेश्वरीच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदिपक यश संपादन केले. टीम कुमिटे - या स्पर्धेत अक्षर पालव व अर्णव शेळके यांनी सुवर्ण पदक मिळविले आहे. तसेच टीम काटा या स्पर्धेतही या दोघांनी रौप्य पदक मिळविले आहे. टीम काटा स्पर्धेत अक्षर पालव, अर्णव शेळके व मोक्षदा शेळके यांना ब्रांझ पदक प्राप्त झाले आहे.



विद्यार्थी व प्रशिक्षक भीमराव पवार आणि धीरज पवार या सर्वांनी श्रीलंकेत जाऊन यश संपादन केल्या बद्दल र.जि.म.ज्ञा.स.संस्थेचे कार्याध्यक्ष व आरजेएमडीएस इंग्लिश स्कुल चे चेअरमन सहदेव सावंत, संस्थेचे उपकार्याध्यक्ष अशोक परब,संस्थेचे सरचिटणीस जितेंद्र पवार, शाळेचे सी.ई.ओ. दीपक खानविलकर, कार्यकारणी सदस्या इंद्रायणी सावंत, मुख्याध्यापिका डिंपल दुसाने, आणि शबनम यांनी अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या. जोगेश्वरीतील विविध संस्था व नागरिकांकडून आरजेएमडीएस इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांचे, पालकांचे, प्रशिक्षकांचे सर्व थरातुन अभिनंदन केले जात आहे.

# थोडक्यात

## कांदा बियाणे विक्रीला शेतकऱ्यांचा प्रतिसाद

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०२, राहुरी (अहिल्यानगर) :** महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ.शरद गडाख व संशोधन संचालक डॉ.विठ्ठल शिर्के यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख शास्त्रज्ञ (बियाणे) डॉ.नितीन दानवले यांच्या देखरेखीखाली विद्यापीठातील बियाणे विक्री केंद्रात 'फुले समर्थ' या कांदा बियाण्याची विक्री सुरू करण्यात आली. पहिल्या दिवशी कांदा बियाणे विक्रीला शेतकऱ्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. कांदा बियाणे विक्रीच्या सुलभतेसाठी विद्यापीठाने यावर्षी कांदा उत्पादक असणाऱ्या नाशिक, अहिल्यानगर व सातारा जिल्ह्यांतील विद्यापीठाच्या अनेक केंद्रांमध्ये बियाणे विक्री व्यवस्था करण्यात आली. यामध्ये नाशिक जिल्ह्यातील कृषी संशोधन केंद्र, निफाड, कांदा लसूण व द्राक्ष संशोधन केंद्र, पिंपळगाव बसवंत, कृषी महाविद्यालय, मालेगाव या ठिकाणी विक्री करण्यात येत आहे.

सातारा जिल्ह्यामध्ये कृषी विज्ञान केंद्र, बोरगाव, कृषी विज्ञान केंद्र, धुळे, कृषी महाविद्यालय, पुणे येथेही विक्री होत आहे. जिल्ह्यातील राहुरी येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ, अहिल्यानगर-पुणे रस्त्यावरील कृषी संशोधन केंद्र (चास) व कृषी संशोधन केंद्र, सावळीविहीर (ता.राहाता) या ठिकाणी फुले समर्थ बियाणे विक्रीसाठी उपलब्ध करून देण्यात आले.

महात्मा फुले कृषी विद्यापीठ येथे ७२८८ किलो बियाणे व उर्वरित नऊ जिल्ह्यातील विक्री केंद्रामध्ये ३७१२ किलो असे मिळून ११ टन कांदा बियाणे विक्रीसाठी उपलब्ध असल्याची माहिती विद्यापीठाच्या प्रसारण केंद्राने दिली. बदलत्या युगात ऑनलाईन तसेच डिजिटल पेमेंटची सुविधा विद्यापीठाच्या बियाणे विभागामार्फत केलेली नसल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना तसेच अनेक शेतकऱ्यांची गैरसोय झाली असल्याचे दिसून आले.

## ढोकेश्वर विद्यालयाच्या प्राचार्य पदी बाळासाहेब खिलारी



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०१, पारनेर (अहिल्यानगर) :** अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज, अहिल्यानगर या नामांकित शिक्षण संस्थेचे, श्री ढोकेश्वर माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय, टाकळी ढोकेश्वर या विद्यालयाच्या प्राचार्य पदी संस्थेने टाकळी ढोकेश्वर गावचे सुपुत्र बाळासाहेब खिलारी यांची पदोन्नतीने दिनांक ०१ जून २०२५ पासून नियुक्ती केली आहे. बाळासाहेब खिलारी यांनी गेली २८ वर्षापासून या संस्थेच्या नेवासा, पारनेर, टाकळी ढोकेश्वर, गोरेगाव येथील विद्यालयात उपशिक्षक म्हणून हिंदी विषयाचे अध्यापन केले आहे. ०१ जानेवारी, २०२५ पासून या विद्यालयात पर्यवेक्षक पद सांभाळले. १ जून पासून या विद्यालयाच्या प्राचार्य पदी संस्थेने, त्यांच्यावर विश्वास दाखवून पदोन्नतीने नियुक्ती केली आहे. याबद्दल संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, सेक्रेटरी विश्वासराव आठरे, उपाध्यक्ष डॉ.विवेक भापकर, सह सेक्रेटरी जयंतराव वाघ, खजिनदार ॲड.दीपलक्ष्मी म्हसे, संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त नंदकुमार झावरे, सिताराम खिलारी, संस्थेच्या गव्हर्निंग कौन्सिलचे डॉ.भाऊसाहेब खिलारी व सर्व पदाधिकारी यंनी अभिनंदन केले आहे.याप्रसंगी बोलताना ते म्हणाले की, विद्यालयाची गुणवत्ता व जो नावलौकिक आहे. तो अधिक वाढविण्यासाठी मी प्रामाणिकपणे प्रयत्न करणार आहे. संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त सिताराम खिलारी व गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य डॉ. भाऊसाहेब खिलारी यांचे विद्यालयास नेहमीच मोलाचे मार्गदर्शन असते. याचा नक्कीच मला विद्यालयाच्या दृष्टीने फायदा होणार असल्याचे खिलारी यांनी आवर्जून सांगितले.

## पत्रकारांना व त्याच्या परिवाराला अगदी मोफत वैद्यकीय सेवा : आत्मा मलिक, संस्थान

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०२, विंचूर (नाशिक) :** शिर्डी जवळच असलेल्या आत्मा मलिक संस्थान मधील, दोन दिवसीय कार्यशाळा व्हॉईस ऑफ मीडिया इंटरनॅशनल फॉर्म यांच्यावतीने कोकमठाणच्या आत्मा मलिक इंटरनॅशनल स्कूल येथे पत्रकारांच्या केडर कॅम्पचा शुभारंभ परमानंद महाराज आणि मान्यवरांच्या हस्ते झाला. पत्रकारिता ही केवळ घटना सांगणारी नसून समाजाला दिशा देणारी असावी, ही एक साधना आहे. ज्यामध्ये आत्मशोध ध्यान आणि संतांचे मूल्य हे समाविष्ट असावेत. असे मार्गदर्शन आत्मा मालीकचे प्रमुख परमानंद महाराज यांनी यावेळी केले. व्हॉईस ऑफ मीडिया इंटरनॅशनल फोरम च्या वतीने कोकमठाण येथील आत्मा मलिक संस्थेच्या पावन भूमीवर आयोजित दोन दिवसीय पत्रकार केडर कॅम्पचा शुभारंभ परमानंद महाराज, आ.अमोल खताळ आणि संजीवनी उद्योग समूहाचे प्रमुख बिपीन कोल्हे यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी परमानंद महाराज म्हणाले बातमी मागील भूमिका समाज घडवणारी असली पाहिजे. स्पर्धेच्या कॅडर कॅम्प युगात पत्रकारांनी मूल्ये आणि हेतू न विसरता पत्रकारीतेतून सेवाभावी ध्येय साध्य करावे. दररोज केवळ १५ मिनिटांचा आत्म संवाद आणि ध्यानाचा वेळ घेतल्यास पत्रकार अधिक स्पष्ट स्थिर आणि समंजस बनतो. स्वातंत्र्यपूर्व काळातील पत्रकारितेचा आदर्श देताना त्यांनी लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, आचार्य अत्रे, बाळशास्त्री जांभेकर यांचा उल्लेख केला. शब्द हे राष्ट्रनिर्मितीचे साधन असून तेच अज्ञान दूर करून लोकशाही मजबूत करू शकतात. असा मौलिक संदेश त्यांनी उपस्थित पत्रकारांना दिला. कार्यक्रमात आ.अमोल खताळ म्हणाले पत्रकार हे समाजाचे दर्पण आहेत.



महायुती सरकारने पत्रकार महामंडळ स्थापन करण्याचे आश्वासन दिले असून, ते मी योग्य ठिकाणी पोहचवेल तर बिपीन कोल्हे यांनी सांगितले की, पत्रकार हा सत्य आणि असत्य याचे विश्लेषण करणारा असून, ग्रामीण पत्रकारांसाठी अशा कार्यशाळा उपयुक्त ठरतील तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून महत्त्वाच्या मुद्द्यांवर पत्रकारांनी प्रकाश टाकावा. कार्यक्रमाचे प्रस्ताविक व्हॉईस ऑफ मीडिया चे प्रदेशाध्यक्ष अनिल म्हस्के यांनी केले. तर सूत्रसंचालन अहिल्यानगर जिल्हाध्यक्ष गोरक्षनाथ मदने यांनी केले. यावेळी समाजशास्त्र अभ्यासक प्रा.सविता गिरे पाटील, आत्मा मलिक ट्रस्टचे नंदकुमार सूर्यवंशी, विश्वस्त प्रदीप कुमार भंडारी, महाराष्ट्र भूषण व्यंकटेश जोशी, ज्योतिषाचार्य जयंत पारधी गुरुजी, आरोग्य सेल प्रमुख भीमेश मुतुला, महिला विंगच्या प्रदेशाध्यक्षा रश्मी मारवाडी आणि सविता चंद्रे तसेच संपूर्ण राज्यातून आलेले पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. महत्वाचे वाईस ऑफ मीडियाच्या सर्व समूहाला आणि त्याच्या पूर्ण कुटुंबाला आत्मा मालिक येथील वैद्यकीय सेवा संपूर्ण मोफत देण्यात येणार आहे अशी घोषणा या कार्यक्रमात देण्यात आली.